Sem. IV

May 2017

**Q. P. Code : 11505**



**( मराठी रुपांतर )**

**( ३ तास )** **( एकूण गूण : १०० )**

**सूचना :** १. **सर्व** प्रश्न **अनिवार्य** आहेत.

२. **उजवी**कडील संख्या उत्तराचे **पूर्ण गुण** दर्शवितात.

३. **आवश्यक** तेथे **कारणे / निर्णयजन्य विधी** लिहावा.

१. खालील प्रश्नांची प्रत्येकी कमाल **दोन वाक्यांत** उत्तरे लिहा :- २०

१) "सुरक्षित धनको" कोणास संबोधले जाते ?

२) भारतातील कोणत्या न्यायालयांना दिवाळखोरीसंबंधीचे न्यायाधिकार आहेत ?

३) दिवाळखोरीच्या कायद्याची दोन उद्दिष्टे लिहा.

४) "न्यायनिर्णित ऋणको" म्हणजे काय ?

५) "लाभांश" म्हणजे काय ?

६) "नंतर मिळवलेली मालमत्ता " म्हणजे काय ?

७) "जास्तीची शिल्लक " म्हणजे काय ?

८) दिवाळखोरीचा अर्ज केव्हा फेटाळला जाऊ शकतो ?

९) "अंतरिम मालमत्ता व्यवस्थापक " (इंटरिम रिसीव्हर) म्हणजे काय ?

१०) "दिवाळखोरीची कृती " याचा अर्थ काय ?

२. खालीलपैकी **कोणत्याही चार** संक्षिप्त टिपा लिहा :- २०

१) इलाखा शहर दिवाळखोरीचा कायदा, १९०९ च्या कलम ९ प्रमाणे दिवाळखोरीची सूचना

२) मालमत्ता प्राप्त होणे

३) धनकोंकडून अर्ज

४) हस्तांतरण वर्ज्य ठरविणे

५) लहान नादारी

६) दिवाळखोर व्यक्तीची अपात्रता

३. खालीलपैकी **कोणतेही दोन** प्रश्न सकारण सोडवा : १२

१) "ब" हा "अ " चा धनको असून, "ब " च्या विनंतीअर्जावरुन न्यायालयाने "अ " ला दिवाळखोर घोषित केले.

१) "अ" विरुद्धची कार्यवाही स्थगित करण्यासंबंधीचे न्यायालयाचे अधिकार स्पष्ट करा.

२) न्यायालय विशेष व्यवस्थापकाची नियुक्ती केव्हा करु शकते ?

munotes.in

TURN OVER

२) अबक प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी कायद्याखाली स्थापन झालेली कंपनी आहे. त्या कंपनीने धनकोंप्रती कर्जफेडीबाबत कसूर केली आहे.

१) कंपनीविरुद्ध धनको दिवाळखोरीचा अर्ज दाखल करु शकतात का ?

२) दिवाळखोरीचा अर्ज म्हणजे काय ?

३) सर्व धनकोंच्या हिताकरीता "क्ष" या ऋणकोने आपल्या सर्व किंवा जवळजवळ सर्व मालमत्तेचे ति-हाईत व्यक्तीस हस्तांतरण केले.

१) "क्ष" ने केलेल्या हस्तांतरणाचे परिणाम सांगा व स्पष्ट करा.

२) फसवणूकीने केलेली निवड म्हणजे काय ?

४. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (**कोणतेही चार**) ४८

१) मुक्तता म्हणजे काय ? संपूर्ण मुक्तता केव्हा नाकारली जाऊ शकते ?

२) न्यायालयाने नेमलेल्या शासकीय बेचनदार तसेच मालमत्ता व्यवस्थापकाचे अधिकार व कर्तव्ये यांची चर्चा करा.

३) हुकुमनाम्याचा आदेश कोणत्या कारणाखाली रद्दबातल केला जाऊ शकतो ? अशा आदेशाचे परिणाम कोणते ?

४) निर्धन व्यक्तींकडून होणारे दावे स्पष्ट करा.

५) कर्ज शाबित होणे आणि लाभांशाचे वाटप स्पष्ट करा.

६) पूर्वीचा दर्जा याबाबत मालमत्ता व्यवस्थापकाचे अधिकार स्पष्ट करा.

---

munotes.in